लोकमत | बुधवार दि. १ मे २०१३
Hello पुणे
hellopune@lokmat.com

# माजी विद्यार्थी मेळावा




भारती विद्यापीठ होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालय होमिओपॅथिक औषधपद्धतीवर निष्ठेने आणि विश्वासाने भर देऊन होमिओपॅथिक वैद्यकशास्त्राचा समाजाला उपयोग करून द्यावा. त्यासाठी त्यांनी स्वत: ८० रुग्णशय्येचे जे रुग्णालय चालवले जाते, त्याची माहितीही देण्यात आली.

- डॉ. अमरसिंह निकम ■ भारती अभिमत विश्वविद्यालयाच्या होमिओपथिक वैद्यकीय महाविद्यालयामध्ये माजी

विद्यार्थी मेळाव्याच्या उद्‌्घाटनप्रसंगी (डावीकडून) डॉ. मृणाल नेर्लेकर, डॉ. अमरसिंह निकम, डॉ. गुरुप्रीत ओबेरॉय व प्राचार्य डॉ. अरुण जाधव. पुणे। दि. ३0 (प्रतिनिधी)

भारती अभिमत विश्वविद्यालयाच्या होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालयामध्ये माजी विद्यार्थ्यांचा पहिला मेळावा मोठय़ा उत्साहात झाला. या मेळाव्यासाठी तब्बल २0 राज्यांतून विद्यार्थी आले होते.

होमिओपॅथीतील ख्यातनाम विशेष तज्ज्ञ डॉ. अमरसिंह निकम यांच्या हस्ते या मेळाव्याचे उद्‌्घाटन झाले. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य व माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष डॉ. अरुण जाधव होते.

डॉ. जाधव म्हणाले, "होमिओपॅथिक क्षेत्रामध्ये हे महाविद्यालय गेल्या २३ वर्षांपासून सातत्याने गुणात्मक काम करत आले आहे. 'होमिओपॅथी तुमच्या दारी' या उपक्रमाच्या माध्यमातून कुलगुरू डॉ. शिवाजीराव कदम व भारती विद्यापीठ वैद्यकीय प्रतिष्ठानच्या कार्यकारी संचालिका डॉ. अस्मिता जगताप यांच्या पुढाकाराने होमिओपॅथिक फिरता दवाखाना व रुग्णवाहिकेस मान्यता देण्यात आली आहे.

होमिओपॅथीचे शिक्षण घेणार्‍या सर्व विद्यार्थ्यांनी ही औषधे व चिकित्सापद्धती समजून घेऊन प्रत्येक गरजू रुग्णाला त्याचा प्रसार, प्रचार करून होमिओपॅथिक प्रॅक्टिस करावी.

या मेळाव्यामध्ये डॉ. जोएल सोलोमन, डॉ. शिल्पा केळकर, डॉ. दीपांशू ठाकूर, डॉ. निखिल कुलकर्णी यांनी होमिओपॅथीच्या भारतीय व जागतिक औषधोपचार दर्जांची माहिती दिली. डॉ. गीता राठी, डॉ. तरंग कृष्णा, डॉ. भालचंद्र गद्रे, डॉ. कार्तिक श्रीनिवासन, डॉ. अमित ढवळीकर, डॉ. सतीश भारती, डॉ. दीप्ती बिरोडकर यांनी त्यांचे अनुभवकथन केले.

डॉ. मृणाल नेर्लेकर यांनी प्रास्ताविक केले. डॉ. ए. डी. महाजन यांनी सूत्रसंचालन केले. सांस्कृतिक विभागाच्या सांस्कृतिक कार्यक्रमांनी या मेळाव्याची सांगता झाली. होमिओपॅथिक औषधपद्धतीवर निष्ठेने आणि विश्वासाने भर देऊन होमिओपॅथिक वैद्यकशास्त्राचा समाजाला उपयोग करून द्यावा. त्यासाठी त्यांनी स्वत: ८0 रुग्णशय्येचे जे रुग्णालय चालवले जाते, त्याची माहितीही देण्यात आली.

- डॉ. अमरसिंह निकम